# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २०३-२२** **दिनांक ०५/०७/२०२२**

## बँकेवर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या आंतरराज्यीय मेवाती (हरियाणा) टोळी पकडण्यास गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांना यश.

रात्रीच्यावेळी विविध बँकेचे ए.टी.एम. फोडण्याचे गुन्हे घडत असल्याने सदरील गुन्हयांना पायबंध घालून दाखल गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने दिनांक ३/०७/२०२२ रोजी गुप्त बातमीदाराचे मार्फतीने माहिती मिळाली की, काही इसम हे नालासोपारा पुर्व येथील बँक लुटण्यासाठी प्रगतीनगर येथे एकत्र जमणार असल्याची खात्रीशिर माहिती प्राप्त झाली. त्याप्रमाणे दिनांक ३/०७/२०२२ रोजी रात्रौ २३.२५ वा. चे सुमारास नालासोपारा पुर्व, प्रगतीनगर, ९० फुट रोडवर महेशा ॲटो सर्व्हीस स्टेशनचे जवळ सापळा लावुन एकुण ७ आरोपीत नामे १) जाहीद हसन खान, उर्फ जस्सी वय २३ वर्षे, रा. शिकरपुर, ता. तावडु, पोलीस ठाणे - तावडु, जिल्हा नुहु, राज्य हरियाणा, २) वारीस जलालु खान, वय २३ वर्षे, रा. गांव- खिल्लुका, ता. हातीन, पोलीस ठाणे हातीन, जिल्हा जिल्हा-पलवल, राज्य हरियाणा, ३) आसीफ मजीद खान, वय २५ वर्षे, रा. गांव- खिल्लुका, ता. हातीन, पोलीस ठाणे हातील, जिल्हा जिल्हा-पलवल, राज्य हरियाणा, ४) हाकम हनीफ खान, वय ३३ वर्षे, रा.मिठाका, ता. हातीन, पोलीस ठाणे - बहीण, जिल्हा-पलवल, राज्य हरियाणा ५) रघुनंदन शिवअविलाश व्दिवेदी उर्फ पंडीत, वय २४ वर्षे, रा. वसुधंरा बिल्डींग, रु नं. १०६, पहीला माळा, विजयनगर, नालासोपारा पुर्व. मुळ रा. ग्राम मेढरहा, पोष्ट- ढोकसहा, ता. मंजनपुर, जिल्हा-कोशंबी, राज्य- उत्तरप्रदेश, पिन–२१२२१६ ६) निजाम रमजानी सय्यद, वय ३५ वर्षे, रा. गांव- नंगला इमाम खा, ता.गोवर्धन, पोलीस ठाणे बरसाना,जिल्हा मथुरा, राज्य उत्तरप्रदेश व ७) राजु ऊर्फ समरजीत दयाराम यादव, वय २० वर्षे, रा. महबुपुर, ता. राजपुरा, पोलीस ठाणे - भदोई, जिल्हा भदोई राज्य- उत्तर प्रदेश यांना दरोडयाची तयारी करत असतांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचेकडुन गुन्हा करण्याकरिता लागणारे साहित्य, गॅस सिलेंडर, गॅस कटर, गॅस रेग्युलेटर, गॅस पाईप, दोन मोठे सुरे,बॅटरी, पिवळया रंगाच्या नायलॉनची रस्सी, एक लोखंडी पहार, स्क्रु ड्रायव्हर, लाल मिरची पुड, नंबर न लिहीलेल्या नंबर प्लेट, व त्यावर चिटकविण्याचे स्टीकर, मोबाईल फोन व कागदपत्रे असा एकुण ३८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला आहे.

सदर बाबत पो शि/१२०९७ अमोल महादेव कोरे नेम- गुन्हे शाखा, कक्ष -२ वसई, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांनी दिलेल्या तक्रारी नुसार तुळींज पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४१२/२०२२ भादंविस कलम ३९९, ४०२ भा.ह.का कलम ४/२५ सह म.पो.अधी. कलम ३७(१)(३), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमुद आरोपी हे आंतरराज्यीय मेवाती गँग राज्य हरियाणाचे सदस्य असुन त्यांनी मिरा-भाईंदर, वसई-विरार, ठाणे, नवी मुंबई इत्यादी परिसरात खालील प्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे.

| अं.नं. | पो स्टे | गु.रजी नं. व कलम |
|---|---|---|
| १. | विरार | ५०४/२०२२ भादविस कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे |
| २. | कोळसेवाडी | ३१५/२०२२ भादविस कलम ३८०, ४२७ प्रमाणे |
| ३. | खारघर | १५४/२०२२ भादविस कलम ३८०, ४२७ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अती. कार्य. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनिरी/ सुहास कांबळे, सपोनिरी/सागर शिंदे, सपोनि/ज्ञानेश्वर जगताप, सहाफौज/रमेश भोसले, पोहवा/९६०३६ संजय नवले, पो.हवा./**०३०४९** महेश पागधरे, पो.हवा/०३०५२ चंदन मोरे, पोहवा/०६०२५ सचिन पाटील, पो.हवा./**०७०९४** प्रशांत पाटील, पो.हवा./**०५०३३** जगदीश गोवारी, पोना/०३०३२ प्रशांतकुमार ठाकुर, पोना/०६१०७ रमेश आलदर, पो.कॉ./१२०९७ अमोल कोरे, पोकॉ/१२०४७ दादा आडके, पोकॉ/१२०५३ सुधीर नरळे, यांनी केली आहे.

